# National Sports Day

National Sports Day is celebrated on 29th August 2016 in the memory of Major Dhyanchand, the magician of hockey. Hon'ble President Vitthal Patil Saheb paid homage to the image of Major Dhyanchand and guided all the players. The principal of the college Dr. Balasaheb Ladgaonkar guided the players. Director of Physical Education Prof. Vikram Yamagekar explained the biography of Major Dhyanchand. All the professors and players were present at this occasion. Prof. Rakshase thanked everyone

पिंपळगाव व उत्तर असे मर्यादित थांबे देण्यात आले आहेत. तरी प्रवाशांनी या

मुसळे प्रवीण म्हाडगुत, विक्रम कुंभार आदी उपस्थित होते.

## कळे येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**कळे / वार्ताहर :**

कळे परिसरात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस म्हणजे राष्ट्रीय क्रीडा दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

कळे येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालय मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. बी. एम. लाडगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक शा. शि. संचालक प्रा. व्ही. एस. यमगेकर यांनी केले. महाविद्यालयाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. तसेच खेळाडूंना कीटचे वाटप करण्यात आले.

यावेळी सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. आभार प्रा. के. एन. राक्षसे यांनी मानले.

विठ्ठल पाटील माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्येही राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका पी. एस. भोसले होत्या.



**कळे : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करताना प्राचार्य डॉ. बी. एम. लाडगावकर. शेजारी प्रा. यमगेकर व इतर.**

क्रीडांगणाचे पूजन मुख्याध्यापिका भोसले यांच्या हस्ते करण्यात आले व ए. ए. पवार यांनी विद्यार्थ्यांना खेळाविषयी माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात पी. एस. भोसले यांनी विद्यार्थ्यांनी खेळाकडे करिअरच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज असल्याचे सांगितले.

यावेळी एस. यू. माळी, एस. एन. नांदवडेकर, के. बी. पाटील, ए. आर. कुंभार, एस. एस. पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. आभार ए. एस. भोसले यांनी मानले.